वन्यप्राण्यांचे हल्ल्यामुळे पशुधन मृत / अपंग / जखमी झाल्यास द्यावयाचे अर्थसहाय्यामध्ये वाढ करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्र. डब्ल्युएलपी-०९१५/प्र.क्र.३०५/फ-१**
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :- ११ नोव्हेंबर २०१६

**पहा :-** शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. डब्ल्यूएलपी-१०.०८/प्रक्र.२७०/फ-१, दिनांक ०२/०७/२०१०.

**प्रस्तावना :-**

वाघ, बिबटया, अस्वल, गवा (बायसन), रानडुक्कर, लांडगा, तरस, कोल्हा, मगर, हत्ती व रानकुत्रे (ढोल) यांच्या हल्ल्यामुळे गाय, बैल, म्हैस, मेंढी, बकरी किंवा इतर पशुधन मृत / अपंग / जखमी झाल्यास दिनांक ०२/०७/२०१० च्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार नुकसान भरपाईची रक्कम संबंधितांना अदा करण्यात येते. सदर शासन निर्णयान्वये पशुधन मृत / अपंग जखमी झाल्या प्रकरणी देण्यात येणारी अर्थसहाय्याची रक्कम कमी असल्यामुळे त्यात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**शासन निर्णय :-**

वाघ, बिबटया, अस्वल, गवा (बायसन), रानडुक्कर, लांडगा, तरस, कोल्हा, मगर, हत्ती व रानकुत्रे (ढोल) यांच्या हल्ल्यामुळे पशुधन मृत / अपंग / जखमी झाल्यास खालीलप्रमाणे अर्थ सहाय्य देण्यात यावे.

| अक्र | पशुधनाचे (पाळीव प्राण्याचे) नाव | देय अर्थसहाय |
|---|---|---|
| १ | गाय, म्हैस व बैल यांचा मृत्यू झाल्यास | बाजारभाव किंमतीच्या ७५% किंवा रु. २५,०००/- (रु. पंचवीस हजार फक्त) यापैकी कमी असणारी रक्कम |
| २ | मेंढी, बकरी व इतर पशुधन* याचा मृत्यू झाल्यास {*वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ मधील कलम २ (१८-अ) प्रमाणे} | बाजारभाव किंमतीच्या ७५% किंवा रु. ६०००/- (रु. सहा हजार फक्त) यापैकी कमी असणारी रक्कम |
| ३ | गाय म्हैस, बैल या जनावरांना कायम अपंगत्व आल्यास | बाजार भाव किंमतीचे ५०% किवा रु. ७,५००/- (रु. सात हजार पाचशे फक्त) यापैकी कमी असणारी रक्कम |
| ४ | गाय, म्हैस, बैल, मेंढी बकरी व इतर पशुधन जखमी झाल्यास | औषधोपचारासाठी येणारा खर्च देण्यात यावा. औषधोपचार शासकीय/ जिल्हापरिषद पशुचिकित्सालयात करण्यात यावा. देय रक्कम मर्यादा बाजार भावाचे २५% किंवा रु. २,५००/- (रु. दोन हजार पाचशे फक्त) प्रती जनावर यापैकी कमी असणारी रक्कम. उक्त नुकसान भरपाई पशुवैद्यकीय अधिकाऱ्याने दिलेल्या प्रमाणपत्राचे आधारे देण्यात यावी. |

**सदर अर्थसहाय्य खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून अनुज्ञेय असेल.**

१) जनावर मालकाने जनावर मेल्यापासून किंवा घटना घडल्यापासून ४८ तासाच्या आंत जवळील वन अधिका-याला / कर्मचाऱ्याला कळविले पाहिजे.

२) वन्यप्राण्याने ज्या ठिकाणी जनावर मारले असेल त्या ठिकाणावरुन जनावराचे शव लोकांनी हलविता कामा नये.

३) जनावराचा ज्या ठिकाणी मृत / अपंग / जखमी झाले असेल त्या ठिकाणापासून १० कि.मी. भागात कोणत्याही वन्यप्राण्याचा ६ दिवसापर्यंत विष देऊन मृत्यू झालेला नसावा.

४) हल्ल्याची बातमी मिळाल्यानंतर संबंधित वनपाल यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन तातडीने पंचनामा करावा. तथापि, जनावराचा मृत्यू कोणत्या वन्यप्राण्याचे हल्ल्याने झाला याची तपासणी वनक्षेत्रपाल दर्जाच्या अधिकाऱ्याकडून करण्यात येऊन द्यावयाची नुकसान भरपाई रक्कमही त्यांचेकडून ठरविण्यात यावी.

५) जनावर मालकाला देण्यात येणारी अर्थ सहाय्याची रक्कम मंजूर करणारा अधिकारी सहाय्यक वन संरक्षक या दर्जापेक्षा खालच्या दर्जाचा नसावा.

६) संबंधितास देण्यात येणारी अर्थ सहाय्याची रक्कम ईएफटी / ईजीएस / एनईएफटी / आरटीजीसद्वारे अदा करण्यात यावी / बँक खात्यात जमा करण्यात यावी.

सदर शासन निर्णय, निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय वित्त विभागाचे अनौपचारिक संदर्भ क्रमांक : १५४/२०१६/ व्यय-१०, दिनांक ०२.०९.२०१६ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६१११५१२२८३७१६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Arvind Shankar Apte

Digitally signed by Arvind Shankar Apte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c0a68ee850c7ae56e3bbf1e252bef5c7e2ba3631df8eadfdcd47cdd3c33b91a1, serialNumber=2972090f5c611c22111cacebf1c55ba326016fa7107614a6b256203dbb7235cd, cn=Arvind Shankar Apte
Date: 2016.11.15 12:32:12 +05'30'

(अरविंद आपटे)
विशेष कार्य अधिकारी
महसूल व वन विभाग

**प्रत माहिती आणि उचित कार्यवाहीसाठी :-**

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. राज्यमंत्री (वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
५) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

७) अपर मुख्य सचिव (कृषी), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) महासंचालक, माहिती व प्रसिध्दी, मंत्रालय, मुंबई.
९) प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१०) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
११) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वनविकास महामंडळ, नागपूर.
१२) प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नागपूर/मुंबई (बोरीवली).
१५) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), सर्व.
१६) मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पुणे.
१७) मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती.
१८) मुख्य वनसंरक्षक तथा संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरिवली.
१९) मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर.
२०) मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर.
२१) मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, सहयाद्री व्याघ्र प्रकल्प, कोल्हापूर.
२२) वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प, गोंदिया
२३) वनसंरक्षक (वन्यजीव), नाशिक.
२४) सर्व जिल्हाधिकारी.
२५) सर्व पोलिस अधीक्षक.
२६) उपवनसंरक्षक (प्रादेशिक) सर्व.
२७) उपवनसंरक्षक (वन्यजीव) ठाणे
२८) विभागीय वन अधिकारी (वन्यजीव), अकोला/औरंगाबाद
२९) विभागीय वन अधिकारी, उस्मानाबाद/बीड / हिंगोली /परभणी/ चिपळूण.
३०) उप विभागीय संगमनेर/मालेगाव/ भोर.
३१) सर्व जिल्हा कृषी अधिकारी.
३२) महालेखापाल-१/२ (लेखापरीक्षण /लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
३३) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
३४) वित्त विभाग (व्यय-१० कार्यासन), मंत्रालय, मुंबई - ३२.
३५) कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
३६) वन कक्षातील सर्व कार्यासने, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३७) फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ (निवडनस्ती).